# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

## सामान्य प्रशासन विभाग


जा.क्र.मनपा/सा.प्र./५०६/२०२६-२७ दिनांक :- १४/१०/२०२६

## // परिपत्रक //

**विषय :- मा. महासभेच्या बैठकीस विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी वेळेवर उपस्थीत राहणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेच्या बैठकीस महानगरपालिकेतील संबंधित विभाग प्रमुख व खाते प्रमुख यांनी उपस्थित राहून मा. महासभेस आवश्यक असलेली माहिती, कागदपत्रे व अभिलेख उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

तथापि, मा. महापौर व मा. आयुक्त महोदय यांनी मा. महासभेच्या बैठकीस संबंधित विभाग प्रमुख व खाते प्रमुख हे वेळेवर तसेच आवश्यक त्या माहितीसह उपस्थित राहत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे मा. सभागृहास आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने, यापुढे मा. महासभेच्या प्रत्येक बैठकीस संबंधित विभाग प्रमुख व खाते प्रमुख यांनी स्वतः वेळेवर उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तसेच महासभेच्या विषयपत्रिकेतील व सभागृहात उपस्थित होणारे आपल्या विभागाशी संबंधित संभाव्य विषयांचा पूर्वअभ्यास करून त्याबाबतची अद्ययावत व वस्तुनिष्ठ माहिती, संबंधित कागदपत्रे, अहवाल व आवश्यक अभिलेख सोबत ठेवणे व आवश्यकतेनुसार सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत सभागृहाला माहिती देणे आवश्यक राहील.

मा. महासभेच्या कामकाजादरम्यान संबंधित विषयावर विचारणा झाल्यास आवश्यक ती माहिती तत्काळ उपलब्ध करून देणे तसेच मा. सभागृहाच्या सूचनांचे पालन करणे ही संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांची जबाबदारी राहील. कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांना महासभेस उपस्थित राहणे शक्य नसल्यास, त्याबाबतची पूर्वकल्पना मा. आयुक्त महोदय यांना देऊन, त्यांच्या मान्यतेने सक्षम अधिकाऱ्यास आवश्यक त्या संपूर्ण माहितीसह उपस्थित ठेवावे.

त्याचप्रमाणे मा. महासभेमध्ये उपस्थित होणारे मुद्दे व त्यासंबंधी मा. महापौर / पीठासीन अधिकारी यांचे निर्देश नोंद करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याची सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख यांनी दक्षता घ्यावी.

सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व यापुढे मा. महासभेच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कोणतीही दिरंगाई अथवा निष्काळजीपणा होणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति :-**
**सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**